**कार्यकारी प्राधिकरणे विभाग**
का.प्रा.वि/आयसीडी/२०१८-१९/४६८
१९ जानेवारी, २०१८

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.७/२०१८-१९

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१८-१९ मधील दि. २ जानेवारी २०१९ रोजी झालेल्या सातव्या बैठकीचे इतिवृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१८-१९ मधील सातवी बैठक बुधवार, २ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी २.०० वाजता **सर फिरोजशहा मेहता, व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२** येथे आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | प्रा. डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे | सदस्य |
| ५. | प्रा. (श्रीमती) रश्मी ओझा | सदस्या |
| ६. | प्रा. डॉ. अजय भामरे | सदस्य |
| ७. | डॉ. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ९. | प्रा. डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १४. | प्रा. सुनिल भिरूड (प्र-कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १५. | डॉ.कविता ए.लघाटे (प्र-वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |
| १८. | डॉ. अर्जून घाटुळे (प्र-संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ ) | निमंत्रित |

➢ **अनुपस्थिती :-**

सदर सभेस खालीस सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. बि.एन.जगताप | सदस्य |
| २. | डॉ रोहिदास काळे<br>संचालक, उच्च शिक्षण, संचालनालय | सदस्य |
| ३. | सचिव, उच्च शिक्षण विभाग | सदस्य |
| ४. | डॉ. अभय वाघ (संचालक तंत्र शिक्षण संचानालय) | सदस्य |

प्रा. बि.एन.जगताप यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली**

**श्री. कृ.पा.सामक**

ज्येष्ठ पत्रकार व मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्री. कृ.पा.सामक यांचे दिर्घ आजाराने दिनांक १८ डिसेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९७ वर्षाचे होते.

**श्रीमती. चित्रा बेडेकर**

वैज्ञानिक संशोधिका आणि उत्तम लेखिका श्रीमती. चित्रा बेडेकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७२ वर्षांच्या होत्या.

**श्री. नाना चुडासामा**

मुंबईचे माजी नगरपाल, ज्येष्ठ समाजसेवक श्री. नाना चुडासामा यांचे वृध्दापकाळाने दिनांक २३ डिसेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षाचे होते.

**श्री. मृणाल सेन**

वास्तववादी दिग्दर्शक श्री. मृणाल सेन यांचे वृध्दापकाळाने दिनांक ३०डिसेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९५ वर्षाचे होते.

## डॉ. यशवंत रारावीकर

ज्येष्ठ अर्थशास्त्रतज्ज्ञ प्रा. डॉ. यशवंत रारावीकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षाचे होते.

## श्री. कादर खान

हिंदी चित्रपठातील, ज्येष्ठ अभिनेते श्री. कादर खान यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षाचे होते.

वरील सर्व व्यक्तींच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून दिवंगताना दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

## ➢ स्वागत

कुलगुरूंनी सर्व सदस्यांचे नववर्षात स्वागत करून नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

दिक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नोबेल विजेते सर रिचर्ड जॉन रॉबर्टस प्रमुख अतिथी म्हणून येणार आहे असे सांगून सर्व सदस्यांना दिक्षांत समारंभास उपस्थित राहण्याविषयी विनंती मा. कुलगुरूंनी केली.

मा. कुलगुरूंनी सांगितले की, श्री पागे यांची विद्यापीठाने व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी च्या बैठकीत बाब क्र. २३ अन्वये पारित झालेल्या ठरावानुसार अंतर्गत सनदी लेखापाल म्हणून नियुक्ती केली आहे. श्री पागे यांना व्यवस्थापन परिषदेसमोर लेखापरिक्षण संर्दभात सद्यास्थितीचे सादरीकरण करण्यासाठी पाचारण करण्यात आले. श्री पागे यांनी आयकर भरणा विषयी व्यवस्थापन परिषदेत सविस्तर माहिती देताना सांगितले की, आपण १३९ कोटीच्या तुट मांडून आयकर विभागास विवरण पत्र सादर केले आहे. यांचा आपल्याला भविष्यातही फायदा घेता येईल. सन २००२ ते २०१२ मध्ये जी प्रकरणे झाली त्यापैकी फक्त १० कोटी आयकर भरायला लागेल यांचा पूर्ण अभ्यास करून



SKS

कार्यवाही केली जाईल व भविष्यातही यांच कार्यक्षमतेने काम करण्याची त्यांनी ग्वाही दिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब व ठराव |
|---|---|
| | **(कार्यकारी प्राधिकरणे विभाग)** |
| बाब क्र. १ | **दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.** |
| ठराव | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावी. |
| | **(कार्यकारी प्राधिकरणे विभाग)** |
| बाब क्र.२ | **दिनांक ७ डिसेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.** |
| ठराव | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावी. |
| | **(कार्यकारी प्राधिकरणे विभाग)** |
| बाब क्र. ३ | **दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी बाब क्र. १७ अन्वये नॅशनल सेंटर फॉर नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नॉलॉजी येथील कार्यरत शिक्षकांच्या सेवा नियमित करण्याबाबतचा ठराव मंजुरीसाठी सादर.** |
| ठराव | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावी. |
| | **(विद्या विषयक प्राधिकरणे)** |
| बाब क्र. ४ | **विद्वत परिषदेच्या दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या सभेमध्ये बाब कमांक ४.८,४.१२, ५.२, ६.२,६.३,आणि ८.१ अन्वये पारित केलेले ठराव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.** |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेच्या दि. २६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या सभेमधील बाब क. ४.१२, ५.२, ७.१, ७.४ अन्वये केलेल्या शिफारशी मंजूर करण्यात आल्या.<br><br>४.८ – बाब क. ४.८ वरील शिफारशी सदर अभ्यासकमाच्या शुल्कामुळे विद्यापीठावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही व सदर |

अभ्यासक्रम तुटीमध्ये चालणार नाही, हे श्री. कुऱ्हाडे, अधिष्ठाता यांनी सांगितल्याप्रमाणे या अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात आला.

श्री. प्रदीप सावंत यांनी विद्यापीठाने असे सहा-सहा महिन्याचे सर्टिफिकेट कोर्स का चालु करावेत अशी विचारणा केली असता, जग झापाटयाने बदलते आहे. सर्व गोष्टी पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमात सामील होत नाही. प्रत्येक मुलाला पदवीचे शिक्षण घेत असताना अधिक काही शिकायची गरज आहे; त्यादृष्टिने ज्या गॅपस आहेत, जे पदवी कार्यक्रम मध्ये शिकवली जात नाही; ते सर्टिफिकेट कोर्सेस शिकविले जातात, व ते पर्यायी असतात, असे कुलगुरूंनी सांगितले.

वरील चर्चेच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत किती डिप्लोमा कोर्सेस/सर्टिफिकेट कोर्सेस चालतात, याची माहिती व्यवस्थापन परिषदेत देण्यात यावी, अशी मागणी श्री. प्रदीप सावंत यांनी केली. त्या अनुषंगाने कुलगुरूंनी सांगितले की, सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सुंपर्ण सांख्यकी देण्यात येईल, असे प्र-कुलगुरूंनी सांगितले.

५.२ - बाब क्र. ५.२ वर चर्चा करताना श्री. मुकादम यांनी विद्वत परिषद कधी-कधी झाल्या या प्रश्नाला उत्तर देताना कुलसचिवांनी सांगितले की, दि. ७ सप्टेंबर, २०१८ व त्यानंतर २६ डिसेंबर, २०१८ रोजी विद्वत परिषदेची बेठक झाली व या तीन महिन्यात कोणतीही विद्वत परिषदेची बैठक झालेली नाही. दिक्षांत समारंभाची बाब विद्वत परिषदेमध्ये येणे गरजेचे असल्याने तीन ते चार महिने विद्वत परिषद का झाली नाही याचे उत्तर द्यावे, असे श्री. मुकादम यांनी विचारल्यानंतर

प्र-कुलगुरूंनी सांगितले की, BOS ची निवडणूक असल्याने विद्वत परिषदेची बैठक झालेली नाही. १ एप्रिल, २०१८ पासून झालेल्या विद्वत परिषदेच्या बैठकीची दिनांक व कार्यसूची देण्यात यावी, अशी मागणी श्री. मुकादम यांनी केल्यानंतर सदर माहिती त्यांना पुरविण्यात आली.

चर्चेच्या अनुषंगाने प्रा. वैभव नरवडे, श्री. प्रदीप सावंत, डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी सूचना केल्या की, पुढील वर्षाच्या दिक्षांत समारंभाच्यावेळी परिधान करीत असणारा पोशाख हा भारतीय पध्दतीने असावा. कुलगुरूंनी या सुचनेचे स्वागत केले; परंतू या वर्षी दिक्षांत समारंभास कमी दिवस शिल्लक राहिल्याने पुढील वर्षापासून व्यवस्थित नियोजन करून कशा प्रकारे पोशाख असावा,

याबाबत समिती गठित करण्यात यावी. समिती गठित करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

६.२ – बाब ६.२ वरील चर्चेच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, सहयाद्री शिक्षण संस्था, गोविंदराव निकम फार्मसी महाविद्यालय, सावर्डे, ता. चिपळूण जिल्हा–रत्नागिरी या महाविद्यालयाला त्याचे प्रलंबित असलेले शुल्क भरण्याच्या सूचना देण्यात याव्यात व सदर शुल्क प्राप्त झाल्यानंतर नो डयुज प्रमाणपत्र संलग्नता विभागाने सादर केल्यानंतर व महाविद्यालयांचे अभ्यासक्रम बंद करण्याबद्दल श्री. मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर बाब व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी.

संलग्नता विभागात किती महाविद्यालयांवर स्थानिक चौकशी समिती पाठवायची प्रकरणे प्रलंबित आहेत व किती महाविद्यालयाबाबत स्थानिक चौकशी समितीचा अहवाल येणे प्रलंबित आहे. याची वर्ष, महाविद्यालय व अभ्यासक्रमनिहाय माहिती देण्यात यावी.

६.३ – बाब ६.३ वरील चर्चेच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, ओरियंटल एज्युकेशन सोसायटीस् ओरियंटल कॉलेज ऑफ फार्मसी, सानपाडा, नवी मुंबई या महाविद्यालयाचे प्रलंबित असलेले शुल्क भरण्याच्या सूचना देण्यात याव्यात व सदर शुल्क प्राप्त झाल्यानंतर व नो डयूज प्रमाणपत्र संलग्नता विभागाने दिल्यानंतर तसेच श्री. मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व माहितीसह महाविद्यालयाचे अभ्यासक्रम बंद करण्याबद्दल सदर बाब व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी.

८.१ – बाब ८.१ बाबत विद्यार्थी एक पदवी व पदव्युत्तर कोर्स करत असेल किंवा एखादी पदवी नियमितपणे व एखादा अभ्यासक्रम दुरस्थ शिक्षण संस्थेमार्फत किंवा दुसऱ्या विद्यापीठामार्फत करत असेल तर ते करण्यास काही हरकत नसावी, असे मत श्री. रश्मी ओझा, अधिष्ठाता अंतर विद्याशाखा यांनी व्यक्त केले. याबाबत असे कुठेही नमूद केलेले नाही की, अशा प्रकारे दुहेरी पदवी शिक्षण घेऊ शकत नाही.

सविस्तर चर्चे नंतर असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ अनुदान आयोगाने एकाचवेळी दोन अभ्यासक्रमाना प्रवेश घेण्याबाबत प्रसिध्द केलेल्या सार्वजनिक सचूनांच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगास पत्र लिहून दुहेरी पदवीचा नियम रद्द केल्याने, दुहेरी पदवी दिल्याने होणाऱ्या शक्यतेच्या/परिणामांचा

| | |
|---|---|
| | विचाराबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मार्गदर्शन घेण्यात यावे.<br>७.४ – बाब ७.४ वरील चर्चेच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांमार्फत घेण्याबाबत मार्गदर्शक तत्वे बनविण्यासाठी प्र-कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली चार अधिष्ठाता यांची समिती गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल विद्वत परिषदेमार्फत व्यवस्थापन परिषदेत २ महिन्यात सादर करावा. प्रथम व द्वितीय वर्षाच्या परिक्षा महाविद्यालयांमार्फत घेतल्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता राखली जाईल व विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याचाही विचार समितीने करण्यात यावा, असे मत श्री. मुकादम यांनी व्यक्त केले. |
| | **(आस्थापना विभाग १/३)** |
| बाब क्र. ५ | **Appointment of Career Development and Placement Officer in Jamnalal Bajaj Institute of Management Studies.** |
| ठराव | After detailed discussion it was resolved that the post of Training and placement Officer (TPO) instead of Career Development and Placement Officer be created for Jamnalal Bajaj Institute of Management Studies, on tenure basis with the break 11 months on the establishment of Mumbai University.<br>Remuneration will be paid from the fees collected from the students for the placement.<br>The qualification, experience, pay scale etc. will be as per the guidelines of AICTE and as per Annexure-B. Further, it was also resolved that the matter of approval of post of TPO be placed before the Board of Governance of JBIMS.<br>As per the suggestion of Adv. Neel Heleker the information regarding the jobs generated from these courses needs to be analysed and the syllabus of the courses be modified to enhance job prospects. The information regarding the courses and their job generation be given in the Management Council meeting.<br>As per advise of Pro-vice-chancellor it was decided to have Centralized Training and placement structure at university level. |
| | **(आस्थापना विभाग १/३)** |
| बाब क्र. ६ | विद्यापीठ निधीतून ३ स्थापत्य अभियंता (**Civil Engineer**) व १ विद्युत अभियंता (**Electrical Engineer**) ही पदे विहित कालावधीकरिता हंगामी |

| | |
|---|---|
| | **स्वरूपात निर्माण करणेबाबत.** |
| ठराव | विद्यापीठाच्या कलिना, ठाणे, कल्याण, रत्नागिरी उपकेंद्र, आंबडवे जिल्हा रत्नागिरी व मॉडेल महाविद्यालय तरळे, फोर्ट परिसर तसेच विविध ठिकाणी वसतीगृहे अशी नवीन बांधकामे व जुन्या इमारतीचे देखभालीचे काम मोठया प्रमाणात सुरू असल्याने स्ट्रक्चरल ऑडीटची कामे सुरू असुन सद्यस्थितीत विद्यापीठात अभियंत्याचे एकच पद असून अभियांत्रिकी विभागातील अपु-या मनुष्यबळामुळे कामाचा ताण लक्षात घेऊन सद्यस्थिती व भविष्यातील विद्यापीठातील कामाचा विचार करता असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र परिपत्रक क्र. युएसजी २००८/(२९०/०८)/विशी - ४ दि. १६ मार्च, २००९च्या नियमाच्या अधिन नाहून व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८ (२) (डी) (१) व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८ (२) (घ) (१) नुसार विद्यापीठ निधीतून ३ स्थापत्य अभियंता (Civil Engineer) व १ विद्युत अभियंता (Electrical Engineer) ही पदे ३ वर्षाकरिता विद्यापीठ निधीतून हंगामी स्वरूपात निर्माण करण्यास मंजूरी देण्यात आली. सदर पदाची अर्हता, अनुभव वेतन/मानधन कामाचे स्वरूप सोबतच्या (परिशिष्ट-अ) प्रमाणे असेल. तसेच असा ही ठराव करण्यात आला की, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पदे भरण्यात यावीत व नियुक्तीच्या पत्राचा मसुदा विधी कक्षाकडून तपासून घेण्यात यावा जेणेकरून भविष्यात कायदेशीर बाबी निर्माण होणार नाही. |
| | **(IQAC Section)** |
| बाब क्र. ७ | **Vision and Mission of University of Mumbai for approval.** |
| ठराव | It was resolved that the following Vision and Mission of the University of Mumbai be accepted :-<br>**Vision –**<br>To remain always inclusive and quality conscious with deep conviction that knowledge not only improves the quality of life, but leads to good character, to capitalize on our inherent advantages to generate skilled manpower for nation building through excellent teaching, attracting talent, fostering creativity, research, and innovation.<br>**Mission –**<br>• To provide free and conducive atmosphere for creative thinking and impart deep disciplinary knowledge with interdisciplinary bandwidth to the learners in order to make them problem solvers, leaders and entrepreneurs;<br>• To assimilate and transmit the values of honesty, equality, human |

| | |
|---|---|
| | dignity, and inclusivity;<br>• To make optimum use of available resources and investments through unconventional means;<br>• To undertake research in frontier and emerging areas to advance knowledge and through innovation turn it into intellectual property and entrepreneurship to accelerate growth;<br>• To contribute effectively to the welfare of society, address the local and global challenges; respecting culture, environment, and sustainability;<br>• To attract, retain and engage talent in diverse disciplines and promote academic rigour and scholarship;<br>• To achieve good governance through comprehensive digitization, decentralization, and state of the art infrastructure; |
| | (परीक्षा व मूल्यमापन विभाग) |
| बाब क्र. ८ | **Proposal for sanction of to and fro Air Fare, Hospitality and other incidental expenses to Chief Guest of Annual Convocation 2019 of the University.** |
| ठराव | It was resolved that permission for to and fro Air Fare from USA, Hotel Grand Hayat accommodation, local travel facility, hospitality and other incidental expenses to be incurred for Hon'ble Chief Guest for the Annual Convocation 2019, be approved. |
| | अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी आलेली बाब<br>(वित्त व लेखा विभाग) |
| बाब क्र. ९ | **As per the authoritization of Management Council meeting held on 27th November, 2018 vide item No. 23 in respect of the Appointment of M/s. P.V. Page & Co (Chartered Accountant) for Internal Audit & Tax Consultant to the University of Mumbai.** |
| ठराव | सदर विषय वित्त व लेखा अधिकारी यांनी मांडला.<br>(i) अंतर्गत लेखापरिक्षण पूर्ण करण्यासाठी वार्षिक शुल्क रू. ५,००,०००/-<br>विद्यापीठातील कर्मचारी/अधिकारी यांची अनेक पदे ब-याच कालावधी पासून रिक्त असल्यामुळे अंतर्गत लेखा तपासणी |

विभागातर्फे अंतर्गत लेखा तपासणीच्या कामात विलंब होत असल्यामुळे त्याचे विपरित परिणाम अंतर्गत ऑडिट व सांविधानिक ऑडिट, आयकर परतावा भरण्यावर होतात. सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, मे. पी. व्ही. पागे ॲण्ड कं. (C.A.) यांना २०१४-१५ ते २०१८-१९ पर्यंत अंतर्गत लेखापरिक्षण यासह वित्त व लेखा विभागाशी संबंधित कामांसाठी अंतर्गत लेखापरिक्षणासाठीची फी रू.५,००,०००/- प्रति वर्ष शुल्कास मंजूरी देण्यात आली.

**(ii) वार्षिक विवरणपत्र सादर करण्याचे शुल्क – रू.१,००,०००/-**

श्री. दिपककुमार मुकादम यांनी असे सांगितले की, आयकर विवरपत्र भरण्याची जबाबदारी संविधानिक लेखापाल यांची आहे; त्यामुळे आयकर विवरणपत्र भरण्याचे काम संविधानिक लेखापाल यांनीच केले पाहिजे. त्यांनी श्री. पागे यांची मदत घेऊन ते काम चोख व अधिक गतिने पुर्ण करणे आवश्यक आहे. याबाबत वित्त व लेखा अधिकारी यांनी असे निदर्शनास आणून दिले की, विद्यापीठाचे आयकर विवरणपत्र सादर करण्यासाठी स्वतंत्र चार्टर्ड अंकाऊंटटची आवश्यकता आहे. विद्यापीठाचे संविधानिक लेखापाल यांच्या नियुक्ती आदेशात याबाबत स्पष्टता नसल्याने, आयकर विषयक कामात अडचणी उद्भवत आहेत. सन २०१३-१४ पासून पुढील आयकर विवरणपत्रे अद्यापही सादर करणे बाकी आहे. मा. कुलगुरूंनी सदस्यांना सद्यस्थितीत आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या नोटीसांची माहिती देऊन आयकर विषयक स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याची आवश्यकता स्पष्ट केली. वित्त व लेखा विभागाच्या कार्यात सुसूत्रता आणण्यासाठी प्रयत्न करावेत. मा. कुलगुरूंना याविषयी निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले.

**(iii) अपिलासाठी शुल्क – रू.२०,०००/-(प्रति सुनावणी)**

याबाबत असा ठराव करण्यात आला की, मा. कुलगुरूंनी मे. पी.व्ही. पागे ॲण्ड कं. यांच्यासोबत पुन्हा वाटाघाटी करून शुल्क निश्चित करावे व याबाबत मा. कुलगुरूंनी अंतिम निर्णय घ्यावा.

मा. कुलगुरूंना महत्वाच्या कामानिमित्ताने जायचे असल्याने त्यांनी प्र-कुलगुरूंना अध्यक्ष पद भुषविण्याची विनंती केली व प्र-कुलगुरूंनी बैठकीचे अध्यक्ष पद भुषविले.

**चर्चेच्या अनुषंगाने खालील विषयांवरील चर्चा झाली व ठराव पारित झाले.**

१) प्राचार्य नारिंग्रेकर यांच्या प्रकारणाबाबत प्राप्त झालेला अहवाल पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात यावा.

२) श्री. मुकादम यांनी विद्यापीठात शिक्षकांच्या मान्यतेबाबत प्रलंबित असलेल्या प्रकारणांची सविस्तर माहिती यादीसह सात दिवसाच्या देण्यात यावी, अशी मागणी केली असता ती मान्य झाली.

३) बिर्ला महाविद्यालयाचे नाव बदलण्यात आले याबाबत, उपकुलसचिव, संलग्नता विभाग यांनी दिलेल्या खुलासाबाबत काय कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी.

४) पुणे या ठिकाणी युवा महोत्सव (युवा स्पंदन) मध्ये विद्यापीठाचा संघ बाद झाला. काही प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू आहे. त्याची पात्रता १० वी पास असल्याने संघ बाद झाला याबाबत अभ्यास करून व्यवस्थापन परिषदेच्या दि. २१.११.२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने मुद्दा क्र १३ बाबत गठित झालेल्या समितीने (प्राचार्य डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे, प्राचार्य अजय भामरे, श्री. प्रदीप सावंत) एका आठवडयात अहवाल सादर करण्यात यावा. तसेच युवास्पंदन मध्ये भाग घेण्यासाठी पात्रता ठरविण्यात यावी; याबाबत काही तांत्रिक बाबी असतील तर त्याबाबतही मार्गदर्शक तत्वे बनविण्यात यावी, असे ठरले. श्री. प्रदीप सावंत यांनी याबाबत विद्यार्थी विकास विभागाच्या प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस दिली का? याबाबत विचारणा केली असता याबाबत विद्यार्थी विकास विभाग प्रमुखांनाकडून अहवाल मागविण्यात आल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

५) नवनीत एज्युकेशन सोसायटीचे रात्र महाविद्यालयाचे डे महाविद्यालयात बदलण्याच्या प्रस्तावावर BOD Resolutions नुसार कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

६) श्री. प्रदीप सावंत यांनी कलिना परिसरातील दुरध्वनी इंटरकॉम व्यवस्था बंद असल्याचे निदर्शनास आणल्याने प्र-कुलगुरू यांनी सदर बाब खरेदी समितीपुढे ठेऊन निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले.

७) प्रा. वैभव नरवडे यांनी हिंद सेवा परिषदेच्या पब्लिक नाईट्स डिग्री कॉलेज वाकोला, सांताक्रुज मुंबई येथे कार्यरत असलेल्या डॉ. सिमा मालणकर यांना प्राचार्य पदाची मान्यता दिली नाही; सदर प्रस्ताव गेल्या चार वर्षापासून प्रलंबित ठेवण्यात आला आहे; त्याचप्रमाणे त्यांची मॉडेल कॉलेज कल्याण येथील प्राचार्य पदास दिलेली मान्यता अचानकपणे रद्द केली, असे सांगितले. श्री.

मुकादम यांनी याबाबत परिस्थिती जैसे थै ठेवून सर्व संबंधितांना कळविण्यात यावे, अशी विंनती केली असता ती मान्य झाली. चर्चेच्या अनुषंगाने असे ठरले की, डॉ. सिमा मालणकर यांना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार डॉ. मालणकर यांनी प्रत्यक्ष सुनावणी देण्याकरिता कुलगुरू व ॲड. निल हेळेकर यांची द्विसदस्यीय समिती गठीत करण्यात यावी, व त्यानंतर योग्य तो निर्णय घेण्यात यावा

८) धन:शाम सराफ महाविद्यालय, मालाड येथे कार्यरत असलेल्या श्रीमती भावना वैद्य यांना विद्यापीठाने पुर्वलक्ष प्रभावीपणे दिलेली कायम मान्यता रद्द करताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार त्यांना प्रत्यक्ष सुनावणी देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांचे निवेदन ऐकून घ्यावे, असे मत प्रा. वैभव नरवडे यांनी व्यक्त केले. श्री. मुकादम यांनी याबाबत परिस्थिती जैसे थै ठेवून सर्व संबंधितांना कळविण्यात यावे, अशी विंनती केली असता ती मान्य झाली.
चर्चेच्या अनुषंगाने असे ठरले की, श्रीमती. भावना वैद्य यांनी त्यांचे निवदेन ऐकण्यासाठी कुलगुरू व ॲड. निल हेळकेर यांची द्विसदस्यीय समिती गठित करण्यात यावी.

९) दादर पारसी कॉलनीच्या जागे संदर्भात समितीला पत्र पाठविण्यात यावी व विद्यापीठ अभियंता यांनी सर्व कागदपत्र समितीला सादर करावी. असे आदेश देण्यात आले.

प्रा. गौतम गवळी यांनी व्यवस्थापन परिषदेमध्ये आपला सहभाग नोंदवून विद्यापीठात त्यांचे योगदान दिले त्याबद्दल त्यांचे व्यवस्थापन परिषदेने आभार व्यक्त केले व भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या.

प्रा. सुनिल भिरूड, प्र-कुलसचिव व डॉ. अर्जुन घाटुळे, प्र-संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी विद्यापीठात त्यांचे जे काही योगदान दिले त्याबद्दल व्यवस्थापन परिषदेने आभार मानले व त्यांना त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या

कुलसचिवांनी व्यवस्थापन परिषदेने त्यांना त्यांच्या कामात मार्गदर्शन व सल्ला दिला तसेच विद्यापीठ प्रशासनात बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

कुलसचिवांनी अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

कुलगुरू | प्र कुलगुरू | कुलसचिव

SKsawant AR-EAU 19-03-19

Enclosure to item No. 6

परिशिष्ट - अ
MC-Meet - 2/01/1
बाब क्र. 6

**Junior Engineer (Civil)** (3 posts)

Qualification :- Degree in Civil Engineering of a recognized University or a degree recognized as equivalent thereto and MS-CIT certificate.
Experience : Minimum one year experience in the relevant field.
Honorarium : Rs.40,000/- p.m.

**Junior Engineer (Electrical)** (1 post)

Qualification :- Degree in Electrical Engineering of a recognized University or a degree recognized as equivalent thereto and MS-CIT certificate.
Experience : Minimum one year experience in the relevant field.
Honorarium : Rs.40,000/- p.m.